तिजोरी रिकामी राहते. जास्तीत करवसुली झालेली नाही, असे अशी स्थिती आहे.

# लक्ष्मी शिंपीला राज्यस्तरीय पुरस्कार

## सायबर सुरक्षा उपक्रमातील कामगिरीसाठी सन्मान

**सकाळ वृत्तसेवा**

धुळे, ता. ३ : श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्थेच्या कर्मवीर पा. रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थिनी लक्ष्मी शिंपी हिने सायबर जागरूकता उपक्रमात उल्लेखनीय कामगिरी करत क्विक हिल फाउंडेशनचा राज्यस्तरीय 'बेस्ट ॲक्टिव्हिटी डायरेक्टर (रनर-अप)' पुरस्कार पटकाविला.

पुणे येथे झालेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात लक्ष्मी शिंपी हिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र सायबर क्राइम विभागाचे प्रमुख डीआयजी संजय शिंत्रे, क्विक हिल फाउंडेशनच्या चेअरपर्सन अनुपमा काटकर, क्विक हिल टेक्नॉलॉजीचे संस्थापक कैलास काटकर, संजय काटकर आदी मान्यवर उपस्थित होते. धुळे शहर व जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालये आणि जनसामान्यांपर्यंत पोहोचून सुमारे २८ हजार लोकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केली. सायबर गुन्ह्यांपासून सावध राहण्याचे मार्गदर्शन करून नागरिकांना आर्थिक फसवणुकीपासून वाचविण्यातही यश मिळाले. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत सायबर वॉरियर लक्ष्मी शिंपी हिला राज्यस्तरीय बेस्ट ॲक्टिव्हिटी डायरेक्टर पुरस्कार प्रदान करण्यात आला.



**पुणे** : क्विक हिल फाउंडेशनचा राज्यस्तरीय बेस्ट ॲक्टिव्हिटी डायरेक्टर पुरस्कार मान्यवरांकडून स्वीकारताना लक्ष्मी शिंपी.

या उपक्रमात लक्ष्मीला समन्वयक प्रा. डॉ. स्वाती बोरसे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील, उपप्राचार्य के. एम. बोरसे, विभागप्रमुख डॉ. राकेश देवरे यांचेही सहकार्य लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष कुणाल पाटील, उपाध्यक्ष डॉ. एस. टी. पाटील यांनी लक्ष्मीसह सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सायबर अवेअरनेस क्लबच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रेसिडेंट तेजस्विनी पवार, सेक्रेटरी प्रशांत भदाणे, मीडिया डायरेक्टर हेमलता गिरासे, तसेच इतर सायबर वॉरियर्स यांच्या सहकार्यातून हे यश प्राप्त झाले.